# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

## पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती (CBCS) अभ्यासक्रम २०२२-२०२३

### विभाग अ (Part-A)

### विद्याशाखा : मानव विज्ञान (Faculty - Humanities)

### अभ्यासक्रम : वाड्.मय स्नातक / बी.ए. (Programme - B.A.)

### विषय : आवश्यक मराठी DSC-2

**प्रस्तावना :- (Preamble)**

'मातृभाषा' मानवी जीवनाचा पाया आहे. आत्मप्रगटीकरण, आत्मचिंतन, विचारांची देवाण-घेवाण, संस्कृतीची जोपासना, समाजातील आर्थिक, राजकीय व्यवहार, व्यक्तिमत्त्वाचा विकास या सर्व गोष्टींसाठी भाषेची आवश्यकता आहे. मातृभाषेच्या सामर्थ्यावर अभ्यासकाला कोणत्याही विषयाच्या अभ्यासासाठी आवश्यक असलेली आकलनशक्ती व कौशल्य यांचा विकास होण्यास मदत होते. साध्या श्रवण-भाषण कौशल्यापासून ते प्रतिभासंपन्न सृजनशीलतेपर्यंत प्रत्येक क्रियेत मातृभाषेची आवश्यकता आहे. मातृभाषेतूनच कोणत्याही क्षेत्रातील ज्ञान मिळविणे सुलभ जाते.

मराठी भाषा अतिशय समृद्ध अशी भाषा आहे. समाजाचा सर्वांगीण विकास हा भाषेच्या माध्यमातून होतो. त्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. भाषिक संवेदना, भावना, विचारशीलता, भाषेच्या विविध प्रवाहाची अभिवृद्धी समाजाच्या विकासाकरिता महत्वाचा असतो. मराठी अनिवार्य अभ्यासक्रमातून वैचारिकता समृद्ध होण्यासाठी मदत होते. तसेच ललित साहित्यातून जीवनानुभवाची नवीन दृष्टी प्राप्त होते. काव्य प्रकारातून सामाजिक अस्मिता अभिव्यक्त होते. मराठी भाषा विद्यार्थ्यांना नव्या जाणिवा, नव्या प्रेरणा देणारा विषय आहे.

## बी.ए. मराठी (आवश्यक) अभ्यासक्रमाची विशिष्ट निष्पत्ती PSOs :

१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मानव विज्ञान विद्याशाखेतील बी.ए. मराठी (आवश्यक) अभ्यासक्रमाच्या अध्ययनामुळे विद्यार्थ्यांची 'साहित्य' ही संकल्पना स्पष्ट होऊन मराठी भाषाविषयक अभिरूची विकसित होईल.

२) मराठी साहित्य परंपरा, लेखक, कवी, विचारवंत यांचा परिचय होईल, त्यांचा लेखनातून आलेल्या सामाजिक एकात्मता, सर्वधर्म समभाव, राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय राज्यघटनेचे अधिष्ठान असलेल्या मानवी मूल्यांची विद्यार्थ्यांमध्ये रूजवणूक होईल.

३) विद्यार्थ्यांमध्ये मराठी, भाषा, साहित्य, कला याविषयी आवड निर्माण होईल. त्याची चिकित्सा, तुलना, समीक्षा करण्याची दृष्टी विकसीत झाल्यामुळे विविध साहित्य प्रकारातील लेखनाचे योग्य अध्ययन, संशोधन आणि सर्जनशील निर्मिती करतील.

४) भाषा आणि साहित्याचा सामाजिक तसेच कलात्मक पातळीवर अभ्यास केल्याने विवेकपूर्ण तर्कसंगतता आणि कारुण्यपूर्ण संवेदनशीलता निर्माण होऊन साहित्याचे, भाषेचे व्यावहारिक उपयोजन करता येईल.

५) कला शाखेच्या विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेच्या तात्विक अभ्यासासह प्रतिष्ठापूर्ण रोजगार मिळविण्यासाठी भाषिक कौशल्ये प्राप्त होतील.

६) मराठी भाषेच्या माध्यमातून विविध क्षेत्रात लागणारे व्यावहारिक कौशल्याचे उपयोजन विद्यार्थी करतील.

७) रोजगारा निर्मितीसाठी लागणाऱ्या विविध कौशल्य निर्मितीचा दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल.

**अभ्यासक्रमाची रोजगारविषयक क्षमता (Employability Potential of the Programme)**

नवा शोध, नवी स्पंदने दुसऱ्यांपर्यंत / समाजापर्यंत पोचवायची असतील तर समर्थ भाषेशिवाय पर्याय नाही. मग ती परंपरागत, संगणकीय, गणिती, एसएमएस तंत्राधारित, इमोजी/चिन्हांची भाषा का असेना, भाषेच्या विद्यार्थ्यांना या अनुषंगाने जवळजवळ सर्वच सेवाक्षेत्रात, व्यवसायाच्या क्षेत्रात अंगिकृत भाषाकौशल्य व त्याच्या जोडीला त्याने आत्मसात केलेल्या इतर कौशल्यामुळे संधीची गंगा त्याच्या आजुबाजूला वाहते आहे व या संधीचे त्याने सोने केले तर त्याला निश्चितच रोजगार प्राप्त होईल.



Scanned with OKEN Scanner

मानव विद्याशाखेतील बी.ए. मराठी (आवश्यक) हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना रोजगाराच्या विविध संधी प्राप्त होतील. त्यातील काही महत्त्वाच्या संधीची यादी खाली दिली आहे.

१) बी.ए. ही पदवी प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करता येईल.

२) राज्य व केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करण्यासाठी सदर अभ्यासक्रम उपयुक्त ठरेल.

३) विविध शासकीय, उद्योग, सेवाविषयक क्षेत्रात रोजगार प्राप्त होईल.

४) व्यावहारिक मराठीच्या माध्यमातून संवाद कौशल्ये अंगी बाणविल्यावर (१) व्यावहारिक - बाजार, दुकान, स्टेशन इ. (२) व्यावसायिक - शिक्षक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, विक्रेता, दलाल, दुभाषी, शेअर दलाल, इ.(३) प्रशासकीय (४) रंगभूमी/लोकरंगभूमी यामध्ये व्यवसायाच्या संधी निर्माण होतील.

५) माहिती प्रसारण या क्षेत्रात उपसंपादक, वार्ताहर, सूत्रसंचालक, कथालेखक, छायाचित्रकार, ध्वनिसंकलक, दिग्दर्शक, सहाय्यक दिग्दर्शक, कार्यकारी निर्माता, स्तंभलेखक, व्हाईस ओव्हर आर्टिस्ट, बातमी विश्लेषक, जनसंपर्क अधिकारी अशा रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

६) दृकश्राव्य माध्यमात संवाद व कथालेखक, पटकथालेखक, पटकथा सल्लागार आणि मार्गदर्शक, मध्यस्थ, निवेदक, सूत्रसंचालक, संहितालेखक, गीतलेखक, माहितीपट निर्माता, नट, कलाकार, गायक, संगीतकार, हास्यकलाकार अशा विविध संधी उपलब्ध आहेत.

७) फलक लेखन, भित्तीपत्रक लेखन, नामपट्टीका लेखन, ब्लॉग रायटर, अहवाल लेखक, मानपत्र/प्रमाणपत्र लेखक, आभासी (घोष्ट रायटर) लेखक, शब्दांकन कर्ता, दिनदर्शिका, शुभेच्छापत्रे, लग्न पत्रिका, निमंत्रण पत्रिका, आमंत्रण पत्रिका यांचे लेखन तथा माहितीपत्रक व विविध मार्गदर्शिकापर माहिती पुस्तिकांचे लेखन करून रोजगाराच्या संधी मिळविता येतील.

८)कार्यक्रम व्यवस्थापन- लग्न, स्वागत समारंभ, विविध प्रदर्शने, प्रचारसभा, रोड शो, परिषदा, सार्वजनिक कार्यक्रम, सार्वजनिक मनोरंजनाचे कार्यक्रम, सत्कारसोहळे, पुरस्कारसोहळे, विविध विषयावर आयोजित संमेलने, क्रीडाविषयक कार्यक्रम, गटचर्चा, परिसंवाद, चर्चासत्र, कार्यशाळा, शिबीर, मेळावे, प्रश्नमंजुषा इत्यादी कार्यक्रमाचे व्यवस्थापनात आज फार मोठ्या व्यवसायिक संधी निर्माण झाल्या आहेत. या कार्यक्रमांचे आयोजन, नियोजन, कौशल्य, जाहिरात, निमंत्रण पत्रिका, मुलाखतकार, सूत्रसंचालक, जनसंपर्क अधिकारी, समुपदेशक, बातमीदार, मंचसज्जा व्यवस्थापन इत्यादींमध्ये विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

९) वरील समारंभामध्ये व्यवस्थापनाकरिता विद्यार्थ्यांची अशी एखादी चमू तयार करता येणे शक्य आहे. सदर समारंभामध्ये कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन, कार्यक्रमाची जाहिरात, कार्यक्रम पत्रिका तयार करणे, सन्मानचिन्ह, मानपत्र तयार करणे, कार्यक्रमाचे उद्‌घाटन सत्र तथा समारोपाचे फलक तयार करणे, मंचसज्ज करणे, लाईट, साऊंड सिस्टीम हाताळणे, पाहुण्यांची ने-आण, त्यांचे स्वागतासाठी पुष्प, हार, बुके, शाल, भेटवस्तू इत्यादीचे नियोजन तसेच रसिकांची बैठक व्यवस्था नियोजन तथा कार्यक्रमाच्या समापनानंतर नाश्ता, चहा, जेवनाचे नियोजन, बातमी तयार करणे किंवा बातमी प्रिंट मिडीया, इलेक्ट्रीक मिडीया पर्यंत पोचविणे. इत्यादी कार्ये या चमुमार्फत पार पाडले जाऊ शकतात. यानिमित्ताने विद्यार्थ्यांना विविध पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

१०) औपचारिक संवाद शिक्षणाच्या माध्यमाने प्रौढ शिक्षण, पालक शिक्षण, संगणक शिक्षण तथा अनौपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून कुटुंब, मित्रसंघ, मेळावे, आस्वादस्थाने, स्पर्धास्थाने, जाहिरात कोडी यामध्येही व्यवसायांच्या संधी आहेत.

११) लोकगीत / प्रादेशिककला - पारंपरिक लोकगीतांचे संकलन, जतन, संवर्धन तसेच लोकनाट्य / नाटक / भारूड / तमाशा / पथनाट्य / लावणी / नाट्यसंगीत यामध्ये भाषेच्या विद्यार्थ्याकरिता अनेक दालने खुली आहेत. या सर्व कलांचे व लोकपरंपरांचे जतन या निमित्ताने होईल व विद्यार्थ्यांना रोजगारही मिळेल.

१२) सॉफ्टवेअर प्रशिक्षण - मोबाईलवर तयार केलेले ऑडिओ/व्हिडीओ त्यांचे संपादन करण्यासाठी कॅनवा, ओबीएस, काईनमास्टर, आई म्युझिक यासारख्या सॉफ्टवेअरचे तंत्रज्ञान समजून घेऊन शॉर्टफिल्म/संगीत/कविता सादरीकरण व्याख्याने/अभिवाचन / सांस्कृतिक कार्यक्रम/भाषण/विविध प्रादेशिककला/ पारंपरिक कला/ खेळ/ गाणी यांचे जतन करणारे व्हिडिओ/ ऑडिओ, व्हिडिओ मिक्सिंग/ टेक्स्ट इन्सर्टिंगसारख्या गोष्टीचे प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.



Scanned with OKEN Scanner

१३) मायक्रोफोन टेक्निक कौशल्य - मोठ-मोठ्या कार्यक्रमांसाठीच नव्हे तर वर्गात शिकविण्यासाठी मायक्रोफोन आता गरजेची वस्तू झाली आहे. या सबंधीचे विशेष पाठ्यक्रम तयार करून मायक्रोफोन हाताळण्याचे मूलभूत तथा एडवान्स प्रशिक्षण घेतलेतर विद्यार्थी रोजगारक्षम होईल.

१४) साऊंड रेकॉर्डिस्ट - काही विद्यार्थ्यांचा आवाज चांगला असतोत्यांनी स्वतःच्या आवाजात जाहिराती तयार केल्या किंवा विविध जाहिरात कंपन्यांना सोबत घेऊन जाहिराती तयार केल्या तर रोजगाराचे नवीन दालन उपलब्ध होईल.

१५) ई-मेल, विविध अँप, युट्युब, ब्लॉग, फेसबुक, ट्विटर, इंटरनेटवरील विविध साईटसच्या माध्यमातून मराठीतील नव्या संकल्पना, शोध, पारिभाषिक शब्द इत्यादी समाजापर्यंत पोचविता येतील व यानिमित्ताने विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी मिळतील.

१६) पर्यटनक्षेत्र- ट्रॅव्हल एजन्सी, विमान कंपन्या, टूर ऑपरेशन कंपन्या यामध्ये सहलीसाठी गाईड तथा दुभाषी म्हणून सुद्धा रोजगार उपलब्ध होईल.

१७) प्रसारमाध्यमातील व्यावसायिक वाचक / निवेदक तथा वक्ता, व्याख्याता, कवी, ललित लेखक, कथा-कथनकार, एकपात्री प्रयोगकर्ता, कीर्तनकार, प्रवचनकार इत्यादी संधी उपलब्ध आहेत.

१८) संकलक, बोली सर्वेक्षक, बोली अभ्यासक, आस्वादकार, भाषाकार, समीक्षक, परिक्षक, निरिक्षक, सुचिकार, आराखडाकार, प्रस्तावनाकार, कुटप्रश्नकार, रिपोर्टवाचक, मांडणीकार, टंकलेखक, संशोधन-सहाय्यक, संशोधन-लेखक, चौर्यकर्मशोधक, मुद्रित शोधक, टिप्पणीकार इत्यादी क्षेत्रात सहाय्यक म्हणून रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

१९) अनुवाद क्षेत्रात मोठी संधी मिळेल.



Scanned with OKEN Scanner

## विभाग ब

### बी.ए. भाग-१, सत्र-१
### विषय : मराठी (आवश्यक)

नेमलेले पाठ्यपुस्तक : 'शब्दगंध' भाग-१ (सत्र १ व सत्र २) (संपादित)
प्रकाशकाचे नाव : राघव पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर

**अभ्यासपत्रिकेची निष्पती (COs) :**

१. नेमलेल्या साहित्यातून जीवनदर्शन, समकालीन व्यवहार जाणिवा यांची माहिती होईल.
२. वैचारिक, ललित, कविता या विविध वाड्.मय प्रकाराचे ज्ञान होईल. या वाड्.मय प्रकाराचे वेगळेपण जाणून घेतील तथा यामधील साम्यभेदाचे आकलन होईल.
३. वैचारिक गद्यातून भाषेच्या सर्जनशील रूपाचे विद्यार्थ्यांना आकलन होईल. तसेच चारित्र्यविषय असलेल्या थोर व्यक्तींच्या जीवनकार्यातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल आणि संकटावर मात करून जीवनात यशस्वी होता येतेहा विचार त्यांच्या मनी रूजेल.
४. ललित कलाकृतीच्या वाचनातून आनंद, बोध, ज्ञान इत्यादींची प्राप्ती होऊन विद्यार्थ्यांच्या जीवनविषयक जाणिवा समृद्ध होतील.
५. वैचारिकता, तात्त्विकता, काव्यात्मकता, भावनात्मकता, सामान्य गोष्टीतील असामान्यत्वाचे दर्शन यातून विद्यार्थ्यांचा दृष्टीकोण संपन्न होईल.
६. विविध प्रकारच्या साहित्याचे आकलन, वर्णन, आस्वादन, विश्लेषण आणि मूल्यमापन करण्याची क्षमता वाढून विद्यार्थ्यांची अभिरूची विकसित होईल.
७. या वाड्.मयप्रकारातून विविध प्रकारचे नीतिमूल्ये, जीवनमूल्ये, यांची शिकवण विद्यार्थ्यांना मिळेल, त्याचा उपयोग उत्तमरीतीने जीवन जगण्यासाठी होईल.
८. 'उपयोजित' घटकाच्या माध्यमातून विविध प्रकारची कौशल्ये त्यांच्यात निर्माण होतील व ते रोजगारक्षम होतील.
९. विचारवंत, लेखक, कवी होण्यासाठी हे अध्ययन प्रेरक ठरेल, सहाय्यभूत ठरेल. यातून विद्यार्थी भाषेचा सर्जनशील वापर कसा करावा हे समजून घेतील व विविध प्रकारातील साहित्य निर्मिती करतील. तसेच व्यवहारिक उपयोजन करून रोजगारक्षम होतील.

| अ.क्र. Sr.No. | घटक Topic | अध्यापन तासिका (Teaching Hours) | श्रेयांक Credit |
|---|---|---|---|
| **विभाग - अ** | **वैचारिक** | | |
| १) | माझे तीन गुरू व तीन दैवते - डॉ.बाबासाहेब आंबेडकर | १२ | |
| २) | सत्यशोधक पंढरीनाथ पाटील आणि महात्मा फुले यांचे चरित्र - डॉ.प्रल्हाद जी. लुलेकर | | |
| ३) | छत्रपती शिवरायांची प्रशासन व्यवस्था - चंद्रशेखर शिखरे | | |
| **विभाग - ब** | **ललित** | | |
| १) | जनानी जयपुरी - वसंत बापट | १२ | |
| २) | गढी - प्रतिमा इंगोले | | |
| ३) | वाघापूर पॅटर्न - अशोक मानकर | | |
| **विभाग - क** | **कविता** | | |
| १) | संतवाणी | ११ | **०३** |
| | अ)पैलतोगे.... - संत ज्ञानेश्वर | | |
| | ब) कांदा, मुळा भाजी - संत सावता माळी | | |
| २) | नवा शिपाई - केशवसुत | | |
| ३) | या भारतात बंधुभाव नित्य वसू दे – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | | |
| ४) | विमान - अजीम नवाज राही | | |
| ५) | पोशींदा - रवींद्र महल्ले | | |
| ६) | अतिक्रमण - विशाल इंगोले | | |
| **विभाग - ड** | **उपयोजित मराठी** | | |
| | लेखनविषयक नियम | १० | |
| | मुद्रित शोधन | | |
| | | ४५ | **०३** |



Scanned with OKEN Scanner

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

| बी.ए. भाग- १ मराठी (आवश्यक) |
| --- |
| सत्र १ ले |

### गुण विभागणी

| एकूण गुण - १०० |
| --- |
| लेखीगुण - ८० |
| अंतर्गत मूल्यमापन - २० |
| वेळ - ३ तास |

अभ्यासक्रमासाठी नेमलेले पाठ्यपुस्तक - **'शब्दगंध' भाग-१** (सत्र-१ व सत्र-२) (संपादित)

प्रकाशकाचे नाव : राघव पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर (विभाग 'अ', 'ब' आणि 'क' साठी)

**उपयोजित मराठी** - संपादक डॉ.केतकी मोडक, संतोष शेणई, सुजाता शेणई - पद्मगंधा प्रकाशन, पुणे या पुस्तकातील

प्रकरण १५ वे - लेखनविषयक नियम - डॉ.मृणालिनी शहा

प्रकरण१६ वे - मुद्रितशोधन- सुजाता शेणई, डॉ.केतकी मोडक

| | | | |
| --- | --- | --- | --- |
| विभाग - अ | वैचारिक | - | २०गुण |
| विभाग - ब | ललित | - | २०गुण |
| विभाग - क | कविता | - | २०गुण |
| विभाग - ड | उपयोजित मराठी | - | २०गुण |

**प्रश्ननिहाय गुण विभागणी :-**

| | |
| --- | --- |
| **विभाग 'अ' व 'ब'** यावर १४ गुणांचा प्रत्येक एक दीर्घोत्तरी प्रश्न | - २८ गुण |
| **विभाग 'क'** यावर प्रत्येकी ०८ गुणांचे दोन लघुत्तरी प्रश्न | - १६ गुण |
| **विभाग 'ड'** मधील उपयोजित मराठीवर प्रत्येकी ०८ गुणांचे दोन लघुत्तरी प्रश्न | - १६ गुण |
| *वस्तुनिष्ठ प्रश्न* - उपरोक्त अभ्यासक्रमातील विभाग 'अ' व 'ब' यावर प्रत्येकी ०३ प्रश्न आणि विभाग 'क' व 'ड' यावर प्रत्येकी ०२ प्रश्न वस्तुनिष्ठ स्वरुपाचे असे एकूण १० बहुपर्यायी प्रश्न विचारले जातील. प्रत्येक प्रश्नास ०२ गुण याप्रमाणे हा प्रश्न २० गुणांचा असेल. | - २० गुण |

**विभाग 'ड'** साठी संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोजित मराठी - संपादक डॉ.केतकी मोडक, संतोष शेणई, सुजाता शेणई - पद्मगंधा प्रकाशन, पुणे या या पुस्तकातील **प्रकरण १५ वे** लेखनविषयक नियम व **प्रकरण १६ वे** - मुद्रितशोधन या प्रकरणावर प्रत्येकी ०८ गुणांची दोन लघुत्तरी प्रश्न विचारल्या जातील.

**कौशल्य विकासावर आधारित अंतर्गत मूल्यमापन :- Skill Enhancement Module (SEM)** - २० गुण

- गुण विभागणी

| | | |
| --- | --- | --- |
| १) गृहपाठ | - | १५गुण |
| २) मौखिक परीक्षा | - | ०५गुण |

**सूचना** :-(१)गृहपाठ आपल्या परिसरातील प्रभावी शिक्षक, डॉक्टर, लोकप्रतिनिधी, आदर्श शेतकरी किंवा सामाजिक कार्यकर्ते यांची मुलाखत शब्दबद्ध करा.

(२) वैचारिक, ललित इत्यादी प्रकारातील उताऱ्याचे मुद्रितशोधन करा.

(३) दिलेल्या उताऱ्याचे प्रमाण मराठी भाषेच्या लेखनविषयक नियमांनुसार लेखन करा.

(४) मौखिक परीक्षाही गृहपाठावर आधारीत असेल.



Scanned with OKEN Scanner

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

### मराठी कौशल्ये विकास अभ्यासक्रम

**Ability Enhancement Course-I**

**शैक्षणिक वर्ष - २०२२-२३ पासून**
**बी.ए.भाग-१, सत्र-१**
**'मराठी भाषिक कौशल्ये : संभाषण कौशल्ये'**

**एकूण तासिका १५, श्रेयांक – १**

**अभ्यासपत्रिकेची निष्पती (COs)**

१. संभाषण कौशल्य विकासाला सहाय्य होईल.
२. मराठी भाषा क्षमतेच्या वाढीस मदत होईल.
३. संभाषण क्षेत्राची दारे खुली होतील.
४. विविध व्यवसाय क्षेत्रात संधी उपलब्ध होईल.

**अभ्यास घटक**

'व्यक्तित्त्व विकासासाठी : संभाषण व लेखनकौशल्ये' - (संपादक : डॉ.पृथ्वीराज तौर, डॉ.शैलेंन्द्र लेंडे, डॉ.वंदना महाजन), अथर्व पब्लिकेशन्स हे संपादित पुस्तक या अभ्यासक्रमासाठी नेमलेले आहे.

**संभाषण कौशल्ये - एकूण तासिका-१५**

१. संभाषण कौशल्ये - राजेंद्र दत्तात्रय थोरात
२. सूत्रसंचालन कौशल्ये - प्रतिभा कदम /जतीन कदम
३. मुलाखत कौशल्ये - शैलेश त्रिभुवन / रवींद्र बेम्बरे
४. वक्तृत्त्व कौशल्ये - पुंडलिक कोलते

(विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणे, परिसरातील विशेष उल्लेखनीय व्यक्तीची मुलाखत घेणे आणि किमान सात ते दहा मिनिटे सार्वजनिक ठिकाणी भाषण करणे अपेक्षित आहे. यादृष्टीने नियोजन अपेक्षित आहे.)

**गुण विभागणी – एकूण गुण २५**

घटक चाचणी / कौशल्य मूल्यांकन - १० गुण

गृहपाठ / कौशल्य विकास प्रकल्प कार्य - १० गुण

चर्चासत्र/ कौशल्यकार्याचे सादरीकरण - ०५ गुण

(अभ्यासपत्रिकेतील सर्व घटकांवर प्रश्न विचारण्यात येतील)



Scanned with OKEN Scanner

## विभाग ब
## बी.ए. भाग-१, सत्र-२
## विषय : मराठी (आवश्यक)

नेमलेले पाठ्यपुस्तक : 'शब्दगंध' भाग-१ (सत्र १ व सत्र २) (संपादित)
प्रकाशकाचे नांव : राघव पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर

**अभ्यासपत्रिकेची निष्पती (COs) :**

१. नेमलेल्या साहित्यातून जीवनदर्शन, समकालीन व्यवहार जाणीवा यांची माहिती होईल.
२. वैचारिक, ललित, कविता या विविध वाड्.मय प्रकाराचे ज्ञान होईल. या वाड्.प्रकाराचे वेगळेपण जाणून घेतील तथा यामधील साम्यभेदाचे आकलन होईल.
३. वैचारिक गद्यातून भाषेच्या सर्जनशील रूपाचे विद्यार्थ्यांना आकलन होईल. तसेच चारित्र्यविषय असलेल्या थोर व्यक्तींच्या जीवनकार्यातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल आणि संकटावर मात करून जीवनात यशस्वी होता येते हा विचार त्यांच्या मनी रूजेल.
४. ललित कलाकृतीच्या वाचनातून आनंद, बोध, ज्ञान इत्यादींची प्राप्ती होऊन विद्यार्थ्यांच्या जीवनविषयक जाणिवा समृद्ध होतील.
५. वैचारिकता, तात्विकता, काव्यात्मकता, भावनात्मकता, सामान्य गोष्टीतील असामान्यत्वाचे दर्शन यातून विद्यार्थ्यांचा दृष्टीकोण संपन्न होईल.
६. विविध प्रकारच्या साहित्याचे आकलन, वर्णन, आस्वादन, विश्लेषण आणि मूल्यमापन करण्याची क्षमता वाढून विद्यार्थ्यांची अभिरूची विकसित होईल.
७. या वाड्.मय प्रकारातून विविध प्रकारचे नीतिमूल्ये, जीवनमूल्ये, यांची शिकवण विद्यार्थ्यांना मिळेल, त्याचा उपयोग उत्तमरितीने जिवन जगण्यासाठी होईल.
८. 'उपयोजित' घटकाच्या माध्यमातून विविध प्रकारची कौशल्ये त्यांच्यात निर्माण होतील व ते रोजगारक्षम होतील.
९. विचारवंत, लेखक, कवी होण्यासाठी हे अध्ययन प्रेरक ठरेल, सहाय्यभूत ठरेल. यातून विद्यार्थी भाषेचा सर्जनशील वापर कसा करावा हेसमजून घेतील व विविध प्रकारातील साहित्य निर्मिती करतील. तसेच व्यवहारिक उपयोजन करून रोजगारक्षम होतील.

| अ.क्र. Sr.No | घटक Topic | अध्यापन तासिका (Teaching Hours) | श्रेयांक Credit |
|---|---|---|---|
| **विभाग - अ** | **वैचारिक** | | |
| १) | हा विद्येचा समय आहे ! - शाहू महाराज | १२ | |
| २) | राष्ट्रसंत व राष्ट्रपिता - राम शेवाळकर | | |
| ३) | शिक्षणाबिगर माणूस धोंडाच - संतोष भीमराव अरसोड | | |
| **विभाग - ब** | **ललित** | | |
| १) | जागल - भाऊ मांडवकर | | |
| २) | हिरवा तपस्वी - शं.ना.नवरे | १२ | |
| ३) | कस्तुरी - विजय जाधव | | |
| **विभाग - क** | **कविता** | | |
| १) | संतवाणी | | |
| | अ) दादला (भारूड) -संत एकनाथ | | ०३ |
| | ब) सदासर्वकाळ अंतरीकुटिल -संत तुकाराम | ११ | |
| २) | रांगूई - मीराताई ठाकरे | | |
| ३) | बाप वावरं पेरते - श्याम ठक | | |
| ४) | या शहरी संवेदनेशी जुळवून घेताना - अशोक इंगळे | | |
| ५) | मैफल - किशोर बळी | | |
| ६) | भगतसिंह - वैभव भिवरकर | | |
| **विभाग - ड** | **उपयोजित मराठी** | १० | |
| | कार्यलयीन पत्रव्यवहार | | |
| | स्व-परिचयपत्र व नोकरीसाठी अर्जलेखन | | |
| | | ४५ | ०३ |



Scanned with OKEN Scanner

**बी.ए. भाग- १ मराठी (आवश्यक)**
**सत्र २ रे**

**गुण विभागणी**

एकूण गुण - १००
लेखी गुण - ८०
अंतर्गत मूल्यमापन - २०
वेळ - ३ तास

अभ्यासक्रमासाठी नेमलेले पाठ्यपुस्तक - **'शब्दगंध'** भाग-१ (सत्र-१ व सत्र-२) (संपादित)

प्रकाशकाचे नाव : राघव पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर (विभाग 'अ', 'ब' आणि 'क' साठी)

**उपयोजित मराठी** - संपादक डॉ.केतकी मोडक, संतोष शेणई, सुजाता शेणई - पद्मगंधा प्रकाशन, पुणे या पुस्तकातील
प्रकरण ३ रे- कार्यालयीन पत्रव्यवहार - डॉ.कल्याणी दिवेकर
प्रकरण ४ थे- स्वपरिचयपत्र व नोकरीसाठी अर्जलेखन - डॉ.भूषण केळकर

| | | | |
|---|---|---|---|
| विभाग - अ | वैचारिक | - | २०गुण |
| विभाग - ब | ललित | - | २०गुण |
| विभाग - क | कविता | - | २०गुण |
| विभाग - ड | उपयोजित मराठी | - | २०गुण |

**प्रश्ननिहाय गुणविभागणी :-**

| | |
|---|---|
| विभाग 'अ' व 'ब' यावर १४ गुणांचा प्रत्येक एक दीर्घोत्तरी प्रश्न | - २८ गुण |
| विभाग 'क' यावर प्रत्येकी ०८ गुणांचे दोन लघुत्तरी प्रश्न | - १६ गुण |
| विभाग 'ड' मधील उपयोजित मराठीवर प्रत्येकी ०८ गुणांचे दोन लघुत्तरी प्रश्न | - १६ गुण |
| वस्तुनिष्ठ प्रश्न - उपरोक्त अभ्यासक्रमातील विभाग 'अ' व 'ब' यावर प्रत्येकी ०३ प्रश्न आणि विभाग 'क' व 'ड' यावर प्रत्येकी०२ प्रश्न वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असे एकुण१० बहुपर्यायी प्रश्न विचारले जातील. प्रत्येक प्रश्नास ०२ गुण याप्रमाणे हा प्रश्न २० गुणांचा असेल. | - २० गुण |

**विभाग 'ड'**साठी संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोजित मराठी - संपादक डॉ.केतकी मोडक, संतोष शेणई, सुजाता शेणई - पद्मगंधा प्रकाशन, पुणे या या पुस्तकातील प्रकरण ३ रे कार्यालयीन पत्रव्यवहार व प्रकरण ४ थे -स्व-परिचयपत्र व नोकरीसाठी अर्ज लेखन या प्रकरणावर प्रत्येकी ०८ गुणांची दोन लघुत्तरी प्रश्न विचारल्या जातील.

**कौशल्य विकासावर आधारित अंतर्गत मूल्यमापन :-** - २० गुण

- गुण विभागणी

१) गृहपाठ - १५ गुण
२) मौखिक परीक्षा - ०५ गुण

**सूचना** :-(१)गृहपाठ आपल्या परिसरातील लेखकाच्या मुलाखतीचे शब्दांकन करा
(२) आपल्या परिसरातील ५ विविध कार्यालयांशी पत्रव्यवहार करा.
(३) स्व-परिचयपत्र तयार करून नोकरीसाठी अर्जलेखन करा.
(४) मौखिक परीक्षा ही गृहपाठावर आधारीत असेल.



Scanned with OKEN Scanner

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**

**मराठी कौशल्ये विकास अभ्यासक्रम**
**Skill Enhancement Course-II**
**शैक्षणिक वर्ष - २०२२-२३ पासून**
**बी.ए.भाग-१, सत्र - २**
**'मराठी भाषिक कौशल्ये : लेखन कौशल्ये'**

**एकूण तासिका १५, श्रेयांक – १**

**अभ्यासपत्रिकेची निष्पती (COs)**

१. लेखन कौशल्य विकासाला सहाय्य होईल.
२. मराठी भाषा क्षमतेच्या वाढीस मदत होईल.
३. लेखन क्षेत्रातील दारे खुली होतील.
४. विविध व्यवसाय क्षेत्रात संधी उपलब्ध होईल.

**अभ्यास घटक**

'व्यक्तित्त्व विकासासाठी : संभाषण व लेखनकौशल्ये' - (संपादक : डॉ.पृथ्वीराज तौर, डॉ.शैलेंन्द्र लेंडे, डॉ.वंदना महाजन), अथर्व पब्लिकेशन्स हे संपादित पुस्तक या अभ्यासक्रमासाठी नेमलेले आहे.

**लेखन कौशल्ये** - एकूण तासिका -१५
१. लेखन कौशल्ये -- प्रतिक्षा गौतम तालंगकर कथले
२. संवाद लेखन कौशल्ये - राजकुमार लक्ष्मणराव तांगडे
३. जाहिरात लेखन कौशल्ये– रवि पवार
४. गीत लेखन कौशल्ये – विनायक पवार

( विद्यार्थ्यांनी लेखन कौशल्ये आत्मसात करुन त्याचे विविध उपक्रमांच्या माध्यमातुन उपयोजन करणे, महाविद्यालयातील विविध कार्यक्रम प्रसंगी नाटक, श्रुतिकेसाठी , संवाद लेखन करणे, निरनिराळ्या माध्यमांसाठी महाविद्यालय तथा संस्थेच्या अभिनव, कल्पक जाहिराती तयार करणे, तथा महाविद्यालयात विशिष्ट कार्यक्रमासाठी गीत निर्मिती करणे अपेक्षित आहे. या दृष्टीने नियोजन अपेक्षित आहे. )

**गुण विभागणी – एकूण गुण २५**

घटक चाचणी / कौशल्य मूल्यांकन - १० गुण

गृहपाठ / कौशल्य विकास प्रकल्प कार्य - १० गुण

चर्चासत्र/ कौशल्यकार्याचे सादरीकरण - ०५ गुण

(अभ्यासपत्रिकेतील सर्व घटकांवर प्रश्न विचारण्यात येतील)



Scanned with OKEN Scanner

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती (CBCS) अभ्यासक्रम २०२२-२०२३**
**विभाग अ (Part-A)**
**विद्याशाखा : मानव विज्ञान (Faculty - Humanities)**
**अभ्यासक्रम : वाड्.मय स्नातक / बी.ए., (Programme - B.A.)**
**विषय : मराठी वाड्.मय (ऐच्छिक)**
**बी.ए.भाग-१, सत्र-१**

**प्रस्तावना :- (Preamble)**

मराठी साहित्याच्या विविध वाड्मय प्रवाहाचा अभ्यासातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतील. विविध साहित्य प्रवाहातील अभ्यासातून साहित्य निर्मितीच्या घटकांचे तंत्र विद्यार्थ्यांच्या अंगी विकसित होतील. साहित्यातून मानवी मूल्यांचे आकलन विद्यार्थ्यांना होईल. वाचन, लेखन, श्रवण कौशल्य विकसित होतील तसेच उपयोजित संकल्पना अभिवृद्ध होतील. साहित्य विश्वातून नवनिर्मितीचा व सर्जनशीलतेचा नवा अविष्कार अभिवृद्ध होण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत होईल. प्रबोधनाची विचारधारा विकसित होईल. संशोधनाची नवप्रेरणा निर्माण होईल. एकूणच सर्व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता साहित्यातील प्रेरणा मार्गदर्शक ठरतील.

**मराठी वाड्.मय (ऐच्छिक) अभ्यासक्रमाची विशिष्ट निष्पत्ती (PSOs) :**

१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मानव विज्ञान विद्याशाखेतील मराठी वाड्.मय (ऐच्छिक) अभ्यासक्रमाच्या अध्ययनामुळे विद्यार्थ्यांची साहित्य ही संकल्पना स्पष्ट होऊन मराठी भाषाविषयक अभिरुची विकसित होईल.
२) मराठी साहित्य परंपरा, लेखक, कवी, विचारवंत यांचा परिचय होईल, त्यांचा लेखनातून आलेल्या सामाजिक एकात्मता, सर्वधर्म समभाव, राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय राज्यघटनेचे अधिष्ठान असलेल्या मानवी मूल्यांची विद्यार्थ्यांमध्ये रुजवणूक होईल.
३) विद्यार्थ्यांमध्ये साहित्य व कला याविषयी आवड निर्माण होईल. त्याची चिकित्सा, तुलना, समीक्षा करण्याची दृष्टी विकसीत झाल्यामुळे विविध साहित्य प्रकारातील लेखनाचे योग्य अध्ययन, संशोधन आणि सर्जनशील निर्मिती करतील.
४) भाषा आणि साहित्याचा सामाजिक तसेच कलात्मक पातळीवर अभ्यास केल्याने विवेकपूर्ण तर्कसंगतता आणि कारुण्यपूर्ण संवेदनशीलता निर्माण होऊन साहित्याचे व्यावहारिक उपयोजन करता येईल.
५)साहित्याच्या विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्याच्या अभ्यासासह प्रतिष्ठापूर्ण रोजगार मिळविण्यासाठी कौशल्ये प्राप्त होतील.
६) रोजगारा निर्मितीसाठी लागणाऱ्या विविध कौशल्यनिर्मितीचा दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल.

**अभ्यासक्रमाची रोजगारविषयक क्षमता (Employability Potential of the Programme)**

नवा शोध, नवी स्पंदने दुसऱ्यांपर्यंत / समाजापर्यंत पोचवायाची असतीलतर समर्थ भाषेशिवाय पर्याय नाही. मग ती परंपरागत, संगणकीय, गणिती, एसएमएस तंत्राधारित, इमोजी भाषा का असेना, साहित्याच्या विद्यार्थ्यांना या अनुषंगाने जवळजवळ सर्वच सेवाक्षेत्रात, व्यवसायाच्या क्षेत्रात अंगिकृत भाषा कौशल्य व त्याच्या जोडीला त्याने आत्मसात केलेल्या इतर कौशल्यामुळे संधीची गंगा त्याच्या आजुबाजूला वाहते आहे व या संधीचे त्याने सोने केलेतर त्याला निश्चितच रोजगार प्राप्त होईल.

मानव विद्याशाखेतील मराठी वाड्.मय (ऐच्छिक)हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना रोजगाराच्या विविध संधी प्राप्त होतील. त्यातीलकाही महत्त्वाच्या संधीची यादीखाली दिली आहे.
१) बी.ए. ही पदवी प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करता येईल.
२) राज्य व केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करण्यासाठी सदर अभ्यासक्रम उपयुक्त ठरेल.
३) विविध शासकीय, उद्योग, सेवाविषयक क्षेत्रात रोजगार प्राप्त होईल.
४) व्यावहारिक मराठीच्या माध्यमातून संवाद कौशल्ये अंगी बाणविल्यावर (१) व्यावहारिक - बाजार, दुकान, स्टेशन इ. (२) व्यावसायिक - शिक्षक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, विक्रेता, दलाल, दुभाषी, शेअर दलाल, इ.(३) प्रशासकीय (४) रंगभूमी/लोकरंगभूमी यामध्ये व्यवसायाच्या संधी निर्माण होतील.
५) माहिती प्रसारण या क्षेत्रात उपसंपादक, वार्ताहर, सूत्रसंचालक, कथालेखक, छायाचित्रकार, ध्वनिसंकलक, दिग्दर्शक, सहाय्यक दिग्दर्शक, कार्यकारी निर्माता, स्तंभलेखक, व्हाईस ओव्हर आर्टिस्ट, बातमी विश्लेषक, जनसंपर्क अधिकारी अशा रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.
६) दृकश्राव्य माध्यमात संवाद व कथालेखक, पटकथालेखक, पटकथा सल्लागार आणि मार्गदर्शक, मध्यस्थ, निवेदक, सूत्रसंचालक, संहितालेखक, गीतलेखक, माहितीपट निर्माता, नट, कलाकार, गायक, संगीतकार, हास्यकलाकार अशा विविध संधी उपलब्ध आहेत.
७) फलक लेखन, भित्तीपत्रक लेखन, नामपट्टीका लेखन, ब्लॉग रायटर, अहवाल लेखक, मानपत्र/प्रमाणपत्र लेखक, आभासी (घोष्ट रायटर) लेखक, शब्दांकनकर्ता, दिनदर्शिका, शुभेच्छापत्रे, लग्न पत्रिका, निमंत्रण पत्रिका,



Scanned with OKEN Scanner

आमंत्रण पत्रिका यांचे लेखन तथा माहितीपत्रक व विविध मार्गदर्शपर माहिती पुस्तिकांचे लेखन करून रोजगाराच्या संधी मिळविता येतील.

८)कार्यक्रम व्यवस्थापन- लग्न, स्वागत समारंभ, विविध प्रदर्शने, प्रचार सभा, रोड शो, परिषदा, सार्वजनिक कार्यक्रम, सार्वजनिक मनोरंजनाचे कार्यक्रम, सत्कार सोहळे, पुरस्कार सोहळे, विविध विषयावर आयोजित संमेलने, क्रीडाविषयक कार्यक्रम, गटचर्चा, परिसंवाद, चर्चासत्र, कार्यशाळा, शिबीर, मेळावे, प्रश्नमंजुषा इत्यादी कार्यक्रमाचे व्यवस्थापनात आज फार मोठ्या व्यवसायिक संधी निर्माण झाल्या आहेत. या कार्यक्रमांचे आयोजन, नियोजन, कौशल्य, जाहिरात, निमंत्रण पत्रिका, मूलाखतकार, सूत्रसंचालक, जनसंपर्क अधिकारी, समुपदेशक, बातमीदार, मंचसज्जा व्यवस्थापन इत्यादींमध्ये विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

९) वरील समारंभामध्ये व्यवस्थापनाकरिता विद्यार्थ्यांची अशी एखादी चमू तयार करता येणे शक्य आहे. सदर समारंभामध्ये कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन, कार्यक्रमाची जाहिरात, कार्यक्रम पत्रिका तयार करणे, सन्मानचिन्ह, मानपत्र तयार करणे, कार्यक्रमाचे उद्घाटन सत्र तथा समारोपाचे फलक तयार करणे, मंचसज्ज करणे, लाईट, साऊंड सिस्टीम हाताळणे, पाहुण्यांची ने-आण, त्यांचे स्वागतासाठी पुष्प, हार, बुके, शाल, भेटवस्तू इत्यादीचे नियोजन तसेच रसिकांची बैठक व्यवस्था नियोजन तथा कार्यक्रमाच्या समापनानंतर नाश्ता, चहा, जेवनाचे नियोजन, बातमी तयार करणे किंवा बातमी प्रिंट मिडिया, इलेक्ट्रीक मिडिया पर्यंत पोहचविणे. इत्यादी कार्ये या चमुमार्फत पार पाडले जाऊ शकतात. यानिमित्ताने विद्यार्थ्यांना विविध पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

१०) औपचारिक संवाद शिक्षणाच्या माध्यमाने प्रौढ शिक्षण, पालक शिक्षण, प्रवासी शिक्षण, संगणक शिक्षण तथा अनौपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून कुटुंब, मित्रसंघ, मेळावे, आस्वादस्थाने, स्पर्धास्थाने, जाहिरातकोडी यामध्येही व्यवसायांच्या संधी आहेत.

११) लोकगीत / प्रादेशिककला - पारंपरिक लोकगीतांचे संकलन, जतन, संवर्धन तसेच लोकनाट्य / नाटक / भारूड / तमाशा / पथनाट्य / लावणी / नाट्यसंगीत यामध्ये भाषेच्या विद्यार्थ्यांकरिता अनेक दालने खुली आहेत. या सर्व कलांचे व लोकपरंपरांचे जतन या निमित्ताने होईल व विद्यार्थ्यांना रोजगारही मिळेल.

१२) सॉफ्टवेअर प्रशिक्षण - मोबाईलवर तयार केलेले ऑडिओ/व्हिडिओ त्यांचे संपादन करण्यासाठी कॅनवा, ओबीएस, काईनमास्टर, आई म्युझिक यासारख्या सॉफ्टवेअरचे तंत्रज्ञान समजून घेऊन शॉर्टफिल्म/संगीत/कविता सादरीकरण व्याख्याने/अभिवाचन / सांस्कृतिक कार्यक्रम/भाषण/विविध प्रादेशिक कला/ पारंपरिककला/ खेळ/ गाणी यांचे जतन करणारे व्हिडिओ/ ऑडिओ, व्हिडिओ मिक्सिंग/ टेक्स्ट इन्सर्टिंगसारख्या गोष्टीचे प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

१३) मायक्रोफोन टेक्निककौशल्य - मोठ-मोठ्या कार्यक्रमांसाठीच नव्हे तर वर्गात शिकविण्यासाठी मायक्रोफोन आता गरजेची वस्तू झाली आहे. या सबंधीचे विशेष पाठ्यक्रमकरून मायक्रोफोन हाताळण्याचे मूलभूत तथा एडवान्स प्रशिक्षण घेतलेतर विद्यार्थी रोजगारक्षम होईल.

१४) साऊंड रेकॉर्डिस्ट - काही विद्यार्थ्यांचा आवाज चांगला असतोत्यांनी स्वतःच्या आवाजात जाहिराती तयार केल्या किंवा विविध जाहिरात कंपन्यांना सोबत घेऊन जाहिराती तयार केल्या तर रोजगाराचे नवीन दालन उपलब्ध होईल.

१५) ई-मेल, विविध अँप, युट्युब, ब्लॉग, फेसबुक, ट्विटर, इंटरनेटवरील विविध साईटसच्या माध्यमातून मराठीतील नव्या संकल्पना, शोध, पारिभाषिक शब्द इत्यादी समाजापर्यंत पोचविता येईल व यानिमित्ताने विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी मिळतील.

१६) पर्यटनक्षेत्र- ट्रॅव्हल एजन्सी, विमान कंपन्या, टूर ऑपरेशन कंपन्या यामध्ये सहलीसाठी गाईड म्हणून रोजगार मिळू शकतो.

१७) दुभाषी म्हणूनसुद्धा रोजगार उपलब्ध होईल.

१८) प्रसार माध्यमातील व्यावसायिक वाचक / निवेदक तथा वक्ता, व्याख्याता, कवी, ललित लेखक, कथा-कथनकार, एकपात्री प्रयोगकर्ता, कीर्तनकार, प्रवचनकार इत्यादी संधी उपलब्ध आहेत.

१९) संकलक, बोली सर्वेक्षक, बोली अभ्यासक, आस्वादकार, भाषाकार, समीक्षक, परिक्षक, निरिक्षक, सुचिकार, आराखडाकार, प्रस्तावनाकार, कुटप्रश्नकार, रिपोर्टवाचक, मांडणीकार, टंकलेखक, संशोधन-सहाय्यक, संशोधन-लेखक, चौर्यकर्मशोधक, मुद्रित शोधक, टिप्पणीकार इत्यादी क्षेत्रात सहाय्यक म्हणून रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

२०) अनुवाद क्षेत्रात मोठी संधी मिळेल.



Scanned with OKEN Scanner

## विभाग ब
## बी.ए. भाग-१, सत्र-१
## विषय :मराठी वाड्.मय (ऐच्छिक)

**अभ्यासपत्रिकेची निष्पती (COs) :**

१) कादंबरी या वाड्.मय प्रवाहातून सामाजिक प्रश्नांची जाणीव निर्माण होऊन व सामाजिक मूल्यांची जाणीव होईल.
२) धूळपावलं या कादंबरीतून समाजातील विविध व्यक्तिरेखा, तथा ग्रामीण संस्कृतीचे दर्शन होईल.
३) नेमलेल्या कांदबरीमधील पात्रांच्या नात्याची गुंतागुंत आणि भावनिक आंदोलनाचा शोध घेता येईल.
४) भाषिक व वाड्.मयीन मूल्यांचा अभ्यास होईल.
५) कादंबरी लेखनाचे तंत्र अवगत करता येईल.
६) कादंबरीचे स्वरुप व घटक समजून घेतल्यामुळे जीवन व्यवहाराच्या केंद्रस्थानी असणाऱ्या मनुष्य व इतर घटकांवर आधारित कादंबरी लेखनाचा प्रयत्न करता येईल.
७) 'काव्यसरिता' च्या माध्यमातून विविध प्रकारच्या रचनांचा अभ्यास करता येईल.
८) सामाजिक जाणिवा, राष्ट्रीय एकात्मता, प्रेमविषयक भावना, भावनिकता या विचारांची बांधिलकी निर्माण होईल.
९) काव्यांच्या विविध प्रवाहांचा परिचय होईल व त्यातून काव्यनिर्मितीची प्रेरणा विकसित होईल.

| अ.क्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास | श्रेयांक |
|---|---|---|---|
| १ | कादंबरी - 'धूळपावलं' - लेखक महेंद्र कदम, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर | ३० | ०४ |
| २ | कविता - 'काव्यसरिता' (संपादित) संपादक - डॉ.गजानन जाधव, डॉ.गजानन मुंदे, राघव पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर ('काव्यसरिता' मधील क्रमांक १ ते १० कविता अभ्यासक्रमात राहतील.) | ३० | |
| | कौशल्याधिष्ठीत घटकअभ्यासक्रम | १५ | |
| | | ७५ | **०४** |

### गुण विभागणी

एकुण गुण - १००
लेखी गुण - ८०
अंतर्गत मूल्यमापन - २०
वेळ - ३ तास

अ)कादंबरी - 'धूळपावलं' - ४० गुण
ब)कविता - 'काव्यसरिता' - ४० गुण

**प्रश्ननिहाय गुण विभागणी :-**

प्रश्न १ - संदर्भासह स्पष्टीकरण - २०गुण
(कादंबरी व कवितेवर प्रत्येकी ०५ गुणांचे दोन संदर्भ विचारले जातील.)
प्रश्न २ - 'धूळपावलं' कादंबरीवर ०१ दीर्घोत्तरी प्रश्न - १२ गुण
प्रश्न ३ - 'धूळपावलं' कादंबरीवर ०१ लघुत्तरी प्रश्न - ०८ गुण
प्रश्न ४ - 'काव्यसरिता' वर ०१ दीर्घोत्तरी प्रश्न - १२ गुण
प्रश्न ५ - 'काव्यसरिता' वर ०१ लघुत्तरी प्रश्न - ०८ गुण
(वरील प्रश्नांना अंतर्गत पर्याय राहतील.)
प्रश्न ६ - वस्तुनिष्ठ बहुपर्यायी १० प्रश्न- प्रत्येकी ०२ गुणांचे - २० गुण
(वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांमध्ये कादंबरी व कवितेवर प्रत्येकी ०५ प्रश्न विचारले जातील.)

**कौशल्य विकासावर आधारीत अंतर्गत मूल्यमापन :-** - २० गुण

- गुण विभागणी
  १) गृहपाठ - १५गुण
  २) मौखिक परीक्षा - ०५गुण

**सूचना :-** (१) गृहपाठासाठी परिसरातील कष्टकऱ्यांच्या जीवनाचे निरीक्षण करून त्यावर टिपण तयार करावे.
(२) आपल्या परिसरातील कवींची मुलाखत घेऊन त्याचे शब्दांकन करा.
(३) मौखिक परीक्षा ही गृहपाठावर आधारित असेल.



Scanned with OKEN Scanner

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती (CBCS) अभ्यासक्रम २०२२-२०२३**
**विभाग अ (Part-A)**
**विद्याशाखा : मानव विज्ञान (Faculty - Humanities)**
**अभ्यासक्रम : वाड्.मय स्नातक / बी.ए., (Programme - B.A.)**
**विषय : मराठी वाड्.मय (ऐच्छिक)**
**बी.ए.भाग-१, सत्र-२**

**प्रस्तावना :- (Preamble)**

मराठी साहित्याच्या विविध वाड्मय प्रवाहाचा अभ्यासातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावतील. विविध साहित्य प्रवाहातील अभ्यासातून साहित्य निर्मितीच्या घटकांचे तंत्र विद्यार्थ्यांच्या अंगी विकसित होतील. साहित्यातून मानवी मूल्यांचे आकलन विद्यार्थ्यांना होईल. वाचन, लेखन, श्रवण कौशल्य विकसित होतील तसेच उपयोजित संकल्पना अभिवृद्ध होतील. साहित्य विश्वातून नवनिर्मितीचा व सर्जनशीलतेचा नवा अविष्कार अभिवृद्ध होण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत होईल. प्रबोधनाची विचारधारा विकसित होईल. संशोधनाची नवप्रेरणा निर्माण होईल. एकूणच सर्व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता साहित्यातील प्रेरणा मार्गदर्शक ठरतील.

**मराठी वाड्.मय (ऐच्छिक) अभ्यासक्रमाची विशिष्ट निष्पत्ती (PSOs) :**

१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मानव विज्ञान विद्याशाखेतील मराठी वाड्.मय (ऐच्छिक) अभ्यासक्रमाच्या अध्ययनामुळे विद्यार्थ्यांची साहित्य ही संकल्पना स्पष्ट होऊन मराठी भाषाविषयक अभिरुची विकसित होईल.

२) मराठी साहित्य परंपरा, लेखक, कवी, विचारवंत यांचा परिचय होईल, त्यांचा लेखनातून आलेल्या सामाजिक एकात्मता, सर्वधर्म समभाव, राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय राज्यघटनेचे अधिष्ठान असलेल्या मानवी मूल्यांची विद्यार्थ्यांमध्ये रुजवणूक होईल.

३) विद्यार्थ्यांमध्ये साहित्य व कला याविषयी आवड निर्माण होईल. त्याची चिकित्सा, तुलना, समीक्षा करण्याची दृष्टी विकसीत झाल्यामुळे विविध साहित्य प्रकारातील लेखनाचे योग्य अध्ययन, संशोधन आणि सर्जनशील निर्मिती करतील.

४) भाषा आणि साहित्याचा सामाजिक तसेच कलात्मक पातळीवर अभ्यास केल्याने विवेकपूर्ण तर्कसंगतता आणि कारुण्यपूर्ण संवेदनशीलता निर्माण होऊन साहित्याचे व्यावहारिक उपयोजन करता येईल.

५) साहित्याच्या विद्यार्थ्यामध्ये मराठी साहित्याच्या अभ्यासासह प्रतिष्ठापूर्ण रोजगार मिळविण्यासाठी कौशल्ये प्राप्त होतील.

६) रोजगारा निर्मितीसाठी लागणाऱ्या विविध कौशल्य निर्मितीचा दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल.

**विभाग-ब**
**बी.ए. भाग-१, सत्र-२**
**विषय :मराठी वाड्.मय (ऐच्छिक)**

**अभ्यासपत्रिकेची निष्पती (COs) :**

१) मानवी जीवन समृद्ध करणाऱ्या 'नाटक' या वाड्.मयप्रकाराचा परिचय विद्यार्थ्यांना होईल.

२) 'वाटा पळवाटा' या नाटकातील विविध मानवी प्रवृत्तीचे दर्शन घडेल.

३) 'वाटा पळवाटा' नाटकांच्या माध्यमातून सामाजिक संस्कृतीचे दर्शन होईल तथा विविध व्यक्तिमत्त्वांचा परिचय होईल.

४) 'वाटा पळवाटा' च्या अभ्यासाने नाटकाचे आकलन, आस्वाद आणि मूल्यमापन करण्याची क्षमता विकसीत होईल.

५) नाटक निर्मितीच्या घटकांचा, तंत्राचा अभ्यास झाल्याने नाटक निर्मिती करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळेल.

६) नाटक / रंगभुमीवर कारकीर्द करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना ही अभ्यासपत्रिका उपयुक्त ठरेल.

७) 'काव्यसरिता' च्या माध्यमातून विविध प्रकारच्या रचनांचा अभ्यास करता येईल.

८) सामाजिक जाणिवा, राष्ट्रीय एकात्मता, प्रेमविषयक भावना, भावनिकता या विचारांची बांधिलकी निर्माण होईल.

९) काव्यांच्या विविध प्रवाहांचा परिचय होईल व त्यातून काव्यनिर्मितीची प्रेरणा विकसीत होईल.

| अ.क्र. | अभ्यासपत्रिकेचे घटक | नेमलेले तास | श्रेयांक |
|---|---|---|---|
| १ | नाटक - 'वाटा पळवाटा' - लेखक दत्ता भगत, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे ३० | ३० | |
| २ | कविता - 'काव्यसरिता' (संपादित) संपादक - डॉ.गजानन जाधव, डॉ.गजानन मुंदे, | ३० | ०४ |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| | राघव पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर ('काव्यसरिता' मधीलक्र मांक ११ ते २५ कविता अभ्यासक्रमात राहतील.) | | |
| ३ | कौशल्याधिष्ठीत घटक अभ्यासक्रम | १५ | |
| | | ७५ | ०४ |

## गुण विभागणी

एकूण गुण - १००
लेखी गुण - ८०
अंतर्गत मूल्यमापन - २०
वेळ - ३ तास

अ) नाटक - 'वाटा पळवाटा' - ४० गुण

ब) कविता - 'काव्यसरिता' - ४० गुण

**प्रश्ननिहाय गुण विभागणी :-**

प्रश्न १ - संदर्भासह स्पष्टीकरण - २०गुण

नाटक व कवितेवर प्रत्येकी ०५ गुणांचे दोन संदर्भ विचारले जातील.

प्रश्न २ - 'वाटा पळवाटा' नाटकावर ०१ दीर्घोत्तरी प्रश्न - १२ गुण

प्रश्न ३ - 'वाटा पळवाटा' नाटकावर ०१ लघुत्तरी प्रश्न - ०८ गुण

प्रश्न ४ - 'काव्यसरिता' वर ०१ दीर्घोत्तरी प्रश्न - १२ गुण

प्रश्न ५ - 'काव्यसरिता' वर ०१ लघुत्तरी प्रश्न - ०८ गुण

(वरिल प्रश्नांना अंतर्गत पर्याय राहतील.)

प्रश्न ६ - वस्तुनिष्ठ बहुपर्यायी १० प्रश्न - प्रत्येकी ०२ गुणांचे - २० गुण

(वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांमध्ये कादंबरी व कवितेवर प्रत्येकी ०५ प्रश्न विचारले जातील.)

**कौशल्य विकासावर आधारित अंतर्गत मूल्यमापन :- - २० गुण**

- गुण विभागणी

१) गृहपाठ - १५ गुण

२) मौखिक परीक्षा - ०५ गुण

सूचना :- (१) गृहपाठासाठी आपल्या परिसरातील लोकगीतांचे संकलन करून त्याचे विशेष नोंदवा.

(२) आपल्याला येणाऱ्या अनुभवाच्या आधारे कविता लिहा.

(३) मौखिक परीक्षा ही गृहपाठावर आधारीत असेल.



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner